# राशिभविष्य - मार्च , २०१५.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

=========================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. नोकरी व्यवसायात मनोनुकुल परिस्थिती राहील. इच्छाआकांक्षा काही प्रमाणात पूर्ण होतील. या राशीच्या काही मंडळीना उच्च पद मिळणे संभवते; तर काहीना पगारवाढ, अधिकारपद असे काही मिळण्याच ी शक्यता दिसते. काहीना नवे मित्र मिळतील तर स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यावसायिक प्रगती साधणे शक्य होईल. पण महिन्याचा उत्तरार्ध पूर्णपणे तर पूर्वार्ध काही प्रमाणात असह्य मनस्ताप देणारा असाच असण्याची शक्यता जाणवते. काहीना जुन्या दबलेल्या प्रकरणाचा पुन्हा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. स्वभावात मानापमान फार असल्यामुळे अकारण श्रम , दगदग सहन करावी लागेल. जपा. नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुलच असेल. स्वभाव हेकट, उद्धट होणे संभवते. जपा. कुमार्गी मित्रांपासून चार हात दूरच राहा. आर्थ िकयेणे दूरच; पण देणे मात्र द्यावेच लागेल. त्यामुळे आर्थिक चिंता निर्माण होणे संभवते. त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. अशा परिस्‍थितीतशुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनीमुळे शारीरिक -मानसिक अनारोग्य बिघडणे शक्य दिसते. काहीना एखादा मोठा आजार होणेही संभवते. जपा. या राशीच्या ज्या मंडळीचा परधर्मीयाशी व्यावसायिक संब ंधअसेल त्यांना अशा संबंधामुळे विशेष लाभ होण्याची शक्यता दिसते. उच्च राशीचा गुरु ग्रह चतुर्थ स्थानी असल्यामुळे गृहसौख्य व कौटुंब िकसुखसमाधान लाभेल. पण नातेवाईक मंडळीपैकी कोणाकडून तरी असह्य मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. स्थावर मालमत्ता असेल तर त्याबाबतचे खरेदीविक्रीचे व्यवहार पूर्ण होतील. श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात अनुकुल/प्रतिकुल असे संमिश्र प्रकारचे अनुभव येणे संभवते. नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक जाईल. गुरु-शुक्रा च्या अनुकुलतेमुळे सतत मनोनुकुल घटना घडतील व सुखशांती लाभेल. मात्र सामान्य नोकरदार मंडळीना कष्ट परिश्रम करूनच

अपेक्षित अर्थप्राप्ती होणे शक्य आहे. दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. काहीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. पण विविध कारणांनी मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता दिसते. तसेच भावंडाकडून मनस्ताप दिला जाणेही संभवते. जपा. काहीना प्रवासाच ेयोग संभवतात. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात मात्र अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. या राशीच्या साहित्यिकांचे साहित्य ग्रथरूपाने प्रसिद्ध होईल. महिन्याचा प्रथम सप्ताह बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तापदायक जाईल.; पण नंतरचा काळ अनुकुल व लाभदायक जाईल. तसेच मानसिक रोग तज्ञव द्रव पदार्थाचे व्यापारी यांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनीमुळे जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. जपा. तसेच अपेक्षित संततीसुख मिळणेही कठीण दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात विविध कारणांनी असह्य मनस्ताप सहन कराव लागण्याची शक्यता जाणवते. जपा. हनुमान उपासना व गुरुदत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या ज्या मंडळीचा यांत्रिक -तांत्रिक व्यवसाय आहे, वैद्यकीय व्यवसाय आहे, किंवा कलात्मक नोकरी-व्यवसाय आहे अशांना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. नोकरदार मंडळीना मात्र महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना महिन्याचा अखेरचा सप्ताह खूपच प्रगतिकारक व लाभदायक होणे संभवते. अध्यात्मात रस असणारांना आध्यात्मिक उपासनेद्वारे उच्च प्रगती साधणे शक्य होईल. सूचक स्वप्ने पडतील. काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होईल. या राशीच्या युवकांनी सध्या आहे तो नोकरी-व्यवसायच चालू ठेवावा. काही नवीन करण्याचा विचारही करू नये. महिन्याच्या उत्तरार्धात रविगुरु शुभ योगामुळे या राशीच्या सर्वांच्याच इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याची शक्यता जाणवते. कुटुंबात शुभ घटना घडतील. पण चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे काही मनस्ताप देणाऱ्या घटना घडणेही शक्य आहे. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काही मंडळीना मौल्यवान वस्तू ंचालाभ होणे संभवते. कलात्मक व्यवसाय असणारांना मात्र महिन्याचा अखेरचा साप्ताहच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “बावन्न

श्लोकी गुरुचरित्रा “चे पठण करा.

(४) कर्क - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. गुरु-राहूतील लाभयोगामुळे आरोग्य उत्तम राहून हातून काही कर्तृत्वाची कामगिरी होणे शक्य असले तरी विविध कारणांनी बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र , शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. साहित्यिकांचे साहित्य ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. महिन्याचा उत्तरार्ध वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते , यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. त्यामुळे मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. नोकरी शासकीय असो की खाजगी असो, या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत त्रास व मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. पण गूढ व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारकव लाभदायक होईल. काहीना दूरच्या प्रवासाची किंवा परदेशगमनाची संधी मिळणे संभवते. पण महिन्याच्या पूर्वार्धात शक्यतो असा प्रवास करू नका. प्रवासात त्रास होणे संभवते. महिन्याच्या प्रथम सप्ताहात जीवनसाथीचे अनारोग्य किंवा अन्य कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच मुलांच्या विविध समस्या त्रस्त करतील. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीगजानन उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

(५) सिंह - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. कष्ट व मनस्ताप सहन करावा लागणे, कुटुंबात कलह, भांडणे होणे, आर्थिक संकटे येणे अशापैकी कारणानी त्रस्त व्हाल. जपा. तसेच जीवनसाथीशी वाद, गैरसमज, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक सुखातही बाधा येऊ शकेल. जपा. असह्य मनस्तापामुळेच शारीरिक आरोग्य बिघडणेही संभवते. शारीरिक उष्णता भडकून ताप येणे, पोटविकार बळावणे, मूत्राशयविकार बळावणे, नोकरीत वरिष्ठांशी न पटणे, मुलांपैकी कोणाची आरोग्यविषयक चिंता त्रस्त करणे अशापैकी घटना त्रस्त करतील. जपा. अपघात भय आहे. जपा. पण अशा प्रतिकुलकाळातही गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा

मिळेल. या राशीच्या काही मंडळीना भूमिलाभ तर काहीना धनलाभ होणे, काहीना मानाचे स्थान प्राप्त होणे तर काहीना कीर्ती , प्रसिद्धी प्राप्त होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास टाळा. प्रवासात त्रास होणेसंभवते. सामाजिक कार्याची आवड असणारांना त्यांच्या कार्यात यश मिळेल व त्यामुळे समाधान मिळेल. अध्यात्मात रस असणारांना आध्यात्मिक उपासनेद्वारे सात्विक सुखसमाधान मिळू शकेल. सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखू शकले तरच या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ नियमितपणे पठण करा.

(६) कन्या - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. तसेच याच राशीतील राहूमुळेकारण असो वा नसो अपमान सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. त्याचप्रमाणे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. जपा. या राशीच्या युवकांना उत्तम नोकरी लाभेल किंवा नवे कार्यक्षेत्र उपलब्ध होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धचअनुकुल असल्यामुळेनोकरीत जे काय साध्य करावयाचे ते त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असून आरोग्यविघातक असल्याचा अनुभव येईल. तसेच वैवाहिक जीवनातील सुखातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. स्वत:चे वा जीवनसाथीचे अनारोग्य , मनस्ताप देणाऱ्या घटना, कोर्ट प्रकरणे , भागीदारी व्यवसायात येणारे अडथळे, कुसंगती अशापैकी कारणांनी आशय मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. अपघात भय आणि वीज भय आहे. जपा. गुरु-शनि शुभ योगामुळे चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यानाही शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील व वाहनसुख मिळेल. तसेच आर्थिक लाभही होतील. या राशीच्या विवाहेच्छू युवकंयुवतींचे विवाह ठरतील व संपन्न होतील. श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

(७) तुळा - या राशीच्या धनस्थानी शत्रु राशीचा शनि ग्रह असल्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. कर्जबाजारी असतील त्यांचे कर्ज अधिक

वाढण्याची शक्यता दिसते. कदाचित त्यामुळे काही मंडळीना कोर्ट प्रकरणाला सामोरे जावे लागण्याची शक्यताही नाकारता येत नाही. जपा. तसेच या शनि ग्रहामुळे कौटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यताही जाणवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याचा संपूर्ण काळ आध्यात्मिक उन्नतीसाठी अनुकुल होईल. तसेच गूढ संशोधन कार्यासही प्रगतिकारक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठांचा त्रास , घरात मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या, कुटुंबातील प्रिय जनांचे दूरत्व, स्वत:चे अनारोग्य अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ होईल. जपा. या महिन्याच्या काळात काही मंडळीना डोकेदुखीचा तर काहीना मेंदूविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. तसेच काहीना ताप येणे, हृदयविकार बळावणे, रक्तविकार बळावणे, इजा होणे, अशापैकी आजार सहन करावे लागतील. जपा. पण गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. महिन्याच्या उत्तरार्धात वाद, मतभेद, जीवनसाथीचे अनारोग्य, भागीदारी व्यवसाय असणारांच्या भागीदारात संशयाने बाधा निर्माण होणे अशा घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शिक्षण क्षेत्र , शास्त्रीय संशोधन क्षेत्र असे कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळीना नवे कार्यक्षेत्र मिळणेही संभवते. काही कर्तृत्ववान मंडळीना मानसन्मानाचे योग येणेही शक्य आहे. तसेच परदेशगमनाची संधी मिळण्याची शक्यताही दिसते. श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे सतत मनावरसंयम ठेवून, क्षुब्ध विचारांवर ताबा ठेवून व सतत सावधानतेने आचरण करूनच प्रतिकुल काळाशी मुकाबला केला पाहिजे. तरच शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. कौटुंबिक जीवनात काही ना काही कारणाने सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. पण अशा परिस्थितीत प्रतिकुलतेचे तडाखे शांतपणे सहन करूनच प्रतिकुलकाळाशी टक्कर देण्यानेच संभावनीय नुकसान टळू शकेल. नोकरदार मंडळीनी नोकरीचे ठिकाणी नम्रतेचे आचरण केल्यास वरिष्ठ काहीच करू शकणार नाहीत. “ महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती “ हे तुकोबांचे वाचन ध्यानात ठेवून आचरण करा. तेच सुखाचे होईल.

तसेच नोकरीतील अधिकारी मंडळीनी वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. गुरु-हर्षल शुभ योगामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक् षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, यांत्रिकतात्रिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. भाग्यस्थानी उच्च राशीचा गुरु ग्रह असल्यामुळे अध्यात्मात रस असणारांना साधनेद्वारे सात्विक सुखशांती लाभेल. श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीनी वर्तमान साडेसातीच्या काळात आर्थिक व्यवहार अत्यंत सावधानतेने व विचारपूर्वक करावेत, असे आग्रहानेसांगावेसे वाटते. कसल्याही मोहाला बळी पडू नये. मानहानी, मनस्ताप देणारा वर्तमान काळ आहे. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळीना अधिकारपद मिळणेही संभवते. काहींचा सन्मान होणेही शक्य आहे. सध्या मन अत्यंत भावनाशील झाले असल्यास आध्यात्मिक उपासनेस काळ अनुकुल होईल व त्यामुळे मन:शांती लाभेल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग संभवतात. या राशीच्या काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहीना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. तसेच गैरसमजाने कुटुंबात मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. जपा. विपरीत परिस्थितीशी सहनशील बनून मुकाबला करा. तेच सुखाचे होईल. त्यामुळे शुक्राच्या अनुकुलतेने घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद व सुख अनुभवू शकाल. महिन्याचाउत्तरार्धात मुलांपैकी कोणाचे विक्षिप्त आचरण, कोणाला काही कारणाने आलेले नैराश्य, कोणाचे आजारपण अशापैकी कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या काळात मुलांच्या शैक्षणिक परीक्षेचा काळ असेल तर काळजी घ्यावी लागेल. पण शुक्राच्या अनुकुतेमुळे फारसा मनस्ताप होणार नाही, असे वाटते. या राशीच्या ज्या मंडळीच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग असेल त्यापैकी काहीना असा धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात शक्यतो आर्थिक समस्या निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी. वाढता खर्च, फसवणूक, आर्थिक नुकसान अशापैकी कारणांनी आर्थिकचिंता निर्माण होणे संभवते. सध्या कोणाच्याही

आर्थिक जबाबदाऱ्या घेऊ नका. जपा. प्रिय जनांशी वाद, भांडणे होणे संभवते. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून डोळयाची दुखणी त्रस्त करतील. गुरु ग्रहाच्या शुभ दृष्टीमुळे वैद्यकीय व्यवसाय असणारांना, औषध विक्रेत्यांना, यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणाऱ्याना, कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच वकिली-सल्लागारी व्यवसाय, शिक्षणक्षेत्र , अन्य बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तसेच कोळसा, लोखंड यांचा व्यापार असणारांनासंपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात गैरसमजामुळे राहती जागा किंवा स्थावरसंबंधी वाद निर्माण होण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे शक्य आहे. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरुमुळेविवाहेच्चूंचे विवाह ठरतील व संपन्न होतील. काहींचे नवे प्रेमसंबंध किंवा स्नेहसंबंध निर्माण होतील. शुभ ग्रहांच्या अनुकुलतेनुसारमधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धेने श्री गणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा.

(११) **कुंभ** - या राशीच्या मंडळीनाया महिन्याचा उत्तरार्ध अविस्मरणीय अनुभव देणारा असा असण्याची शक्यता आहे. शत्रुराशीतच शनि ग्रह असल्यामुळे नोकरी-व्यवसायात अडचणी, अडथळे, मनस्ताप देणाऱ्या घटना, अकल्पितपणे घडणाऱ्या घटना यांचा अनुभव येणे संभवते. म्हणून या काळात सतत सावधानतेने आचरण करा व विचारपूर्वक आवश्यक ती कृती करा. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून घरीदारी मनस्ताप देणारा असाच असल्याचा अनुभव येईल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी सतत मन व विचारशक्ती शांत राखणे जरूरीचे होईल. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. फसवणूक, आर्थिक नुकसान होणे संभवते. जपा. त्यातचघरातील सदस्यांत भांडण तंटे होणेही संभवते. जपा. यामुळेच शारीरिक उष्णता भडकून नेत्रविकार , घसा, मान, दाढा दुखणे अशी दुखणी बळावतील. जपा. अपेक्षित अर्थसहाय्य मिळविण्यासाठी खूप कष्ट दगदग सहन करावी लागेल. या काळात जिभेला लगाम घाला. मौन व्रत धारण करून व सहनशील बनून विपरीत काळाला सामोरे जा. तेच सुखाचे होईल. मंगळ-शुक्र या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर परिस्थितीत थोडी सुधारणा होईल व मनाला दिलासा देणाऱ्या घटना घडतील. गुरु-शनि शुभ योगामुळे चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय वकिली-सल्लागारी व्यवसाय, अकौन्टनसी व्यवसाय असणारांना काळ अनुकूल, प्रगतिकारक व लाभदायक होईल.

वरील नोकरी-व्यवसायास अनुकुल असे शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना काळ प्रगतिकारक होईल. कुलदैवताची उपासना अनुकुल व सुखकारक होईल.

**(१२) मीन** - या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या अतिशय अस्थिर, चंचल व लहरी असा झाला असण्याची शक्यता जाणवते. धाक, दडपण, उपदेश अगदी असह्य होत असावा, असे वाटते. ज्यांची लहान मुले याच राशीची असतील त्यांनी आपल्या मुलांच्या आचरणाकडे सतत लक्ष ठेवावे. स्वभाव हटटी झाला असल्यास अकारण श्रम , दगदग कराल व थकून जाल. जपा. रक्तदाब, ह्रदयविकार अशी दुखणी असणारांनी मन व विचारशक्ती अगदी शांत ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नियोजित कार्यात अडथळे येणे, आर्थिक समस्या, येणे वसूल न होणे, फसवणूक होणे अशापैकी कारणांनी आशय मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. त्यामुळेच शारीरिक उष्णता भडकून डोळे, मान, घसा, दाढा यांची दुखणी सहन करावी लागतील.जपा. अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल. तसेच नवे प्रेमसंबंध , स्नेहसंबंध जुळून येण्यास काळ अनुकुल होईल. काहींना अर्थलाभ होणेही संभवते. मात्र राहूमुळे दाम्पत्य जीवनात अपेक्षित सुख समाधान मिळण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे त्यांनी सहनशील बनून व मनावर ताबा ठेवूनच प्रतिकूल काळ व्यतीत करावा. पण चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र , वकिली, सल्लागारी व्यवसाय, हिशेब अशापैकी कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुलव लाभदायक होईल. तसेच गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारानाही काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. आध्यात्मिक उपासना अनुकुल व सुखकारक होईल.

=====ooo0ooo=====